महाराष्ट्र शासन

# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ईमेल:- chandrapur.rdc@gmail.com

दुरध्वनी क्रमांक:-07172-250659

क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 653

दिनांक:- 30 जून,2020

संदर्भ :- 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, कलम 34 (C) 34 (M)
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897,
3. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/600 दि.17 जून,2020
4. मुख्याधिकारी नगर परिषद ब्रम्हपुरी यांचे पत्र क्रमांक कावि/ नपब्र/साप्रवि/2020/741 दिनांक 29 जून,2020

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

**-: आदेश :-**

**फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये मनाई आदेश**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यांतर्गत कोरोना विषाणुचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन महाराष्ट्र शासन, आरोग्य विभागाव्दारे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंध कायदा, 1897 लागु करुन त्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यात आली आहे व त्याकरिता अधिसुचना व नियमावली निर्गमित करण्यात आल्या आहेत.

आणि ज्याअर्थी वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय , ब्रम्हपुरी यांचे दिनांक 29.06.2020 रोजीचे प्राप्त् अहवालानुसार ब्रम्हपुरी शहरामध्ये काही व्यक्तीचे अहवाल कोरोना पॉझिटीव्ह असल्याचे निदर्शनास आल्याने सदर पॉझिटीव्ह रूग्ण हे शहरातील इतर नागरीकांच्या संपर्कात आल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सदर रूग्णाच्या संपर्कात आलेल्या नागरीकांचा लवकरात लवकर शोध घेणे आवश्यक आहे ज्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भात रोखणे शक्य होईल. तसेच शहरातील इतर भागात कोरोना पॉझीटीव्ह रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेता उपाययोजना म्हणुन ब्रम्हपुरी शहर पुढील तीन दिवसाकरीता बंद ठेवण्याबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपुरी यांनी संदर्भिय क्रमांक 04 अन्वये प्रस्तावित केलेले आहे.

आणी ज्याअर्थी कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव शहरातील इतर भागात पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 144 खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशून आदेश काढणे व ब्रम्हपुरी शहर पुर्णत: बंद करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी **मी. डॉ.कुणाल खेमणार, जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर** फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 (1974 चे 2) चे कलम 144 नुसार मला प्राप्त अधिकारान्वये सदरचा प्रतिबंधात्मक आदेश लागु करीत आहे .

सदर आदेश ब्रम्हपुरी शहराकरीता दि. ०१.०७.२०२० ते दि. ०३.०७.२०२० चे मध्यरात्री पर्यंतचे कालावधीकरिता अंमलात राहील.

उपरोक्त कालावधीत फक्त सरकारी कार्यालये, सर्व प्रकारची रुग्णालये, औषधालय, औषधांची दुकाने सूरू राहतील. वैद्यकीय सेवेकरीता आवश्यक वाहतूक सेवेव्यतिरिक्त इतर सर्व वाहतूक सेवा बंद राहतील. त्याचप्रमाने इतर सर्व प्रकारची दुकाने /आस्थापना पूर्णतः बंद राहतील. या कालावधीत शासकीय

कर्मचारी, वैद्यकीय सेवेतील कर्मचारी, आणि स्वच्छता विषयक कर्मचारी यांचे व्यतिरिक्त इतर कोणत्याही सामान्य नागरिकास घराबाहेर पडण्यास मनाई असेल.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा, 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188, 269, 270, 271 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदरचा आदेश ब्रम्हपुरी नगर परिषद हद्दीत लागू राहील.**

सदरचा आदेश आज **दिनांक 30 जून,2020** रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

सही/-
(डॉ. कुणाल खेमनार) भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी,
चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहितीस तथा योग्य कार्यवाहीस्तव.**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपुर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपुर
3. जिल्हा आरोग्य अधिकारी , जि.प. चंद्रपुर
4. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपुर
5. उपविभागीय पोलीस अधिकारी, , ब्रम्हपुरी

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस.**

1. तहसिलदार, ब्रम्हपुरी यांना शहरातील संपुर्ण परिस्थिततीवर नियंत्रण ठेवून आवश्यक ती कार्यवाही करणेस्तव अग्रेषित.
2. पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी यांना शहरातील मुख्या रस्ते बंद करून आवश्यक तो बंदोबस्त ठेवण्यास कार्यवाही करणेस्तव अग्रेषित.
3. गट विकास अधिकारी ब्रम्हपुरी / नागभिड यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
4. मुख्याधिकारी,नगर परिषद ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
5. वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय,ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
6. तालुका आरोग्य् अधिकारी ब्रम्हपुरी यांना जास्तीत जास्त् कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करणे व इतर आवश्यक आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

जिल्हादडाधिकारी,
चंद्रपूर